# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव

(ग्रामपंचायत शाखा)

दुरध्वनी क्र.0257-2220152 Email-dycolvpjalgaon@gmail.com फॅक्स क्र.0257-2220500

क्र.साशा/ग्रामप/ईकावि/ 12124/213 /2020 दिनांक 14/05/2020

प्रति

**तहसिलदार, ------------------ (सर्व)**
**जळगांव**

**विषय** :- जळगांव जिल्हयातील आपल्या तालुक्यात अधिनस्त् असलेल्या ज्या **ग्रामपंचायत मध्ये सरपंच उपसरपंच पद रिक्त असेल त्या ठिकाणी सरपंच उपसरपंच पदाची निवडणुकीची कार्यवाही घेणेबाबत.**

**संदर्भ**:- अतिरिक्त मुख्य सचिव, यांचे कडिल पत्र क्र. ग्रापनि-२०२०/प्र.क्र.१८/पंरा-२ ग्रामविकास विभाग दि. १२ मे २०२०

उपरोक्त संदर्भिय पत्र व विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, कोरोना विषाणु-कोव्हिड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन निवडणुकीशी संबंधित कामकाज आहे त्या टप्प्यावर स्थगित करण्याबाबत राज्य निवडणुक आयोगाने दि. 17/03/2020 रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी सर्व यांना कळविल्यानुसार या कार्यालयाने आपणांस कळविले आहे.

त्या अनुषंगाने सर्व जिल्हयांमध्ये ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच निवडीबाबत वारंवार विचारणा होत असल्याने ग्रामविकास विभाग यांनी त्यांचेकडील संदर्भिय पत्रानुसार आपल्या जिल्हयातील सरपंच/उपसरपंच यांच्या राजीनाम्यामुळे किंवा इतर कारणामुळे रिक्त झालेल्या सरपंच व उपसरपंच पदाची निवड होणेसाठी ग्रामपंचायतीची बैठक घेणेबाबत संबंधित तहसिलदार यांना निर्देश देण्यात यावेत ब सरपंच व उपसरपंच पदाची निवड करण्यात यावी आणि सदर बैठकीदरम्यान शासनाने काव्हिड-19 बाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करणेबाबत कळविलेले आहे.

तरी आपल्या अधिनस्त असलेल्या ज्या ग्रामपंचायतीमध्ये सरपंच/उपसरपंच पद रिक्त असेल व अशा ग्रामपंचायतींचे सरपंच निवडीचे प्रस्ताव आपल्या कार्यालयास ग्रामसेवकांकडून प्राप्त झालेले असतील ते प्रस्ताव सरपंच निवड घेणेबाबतच्या परवानगीसाठी या कार्यालयास पाठविण्यांत यावेत अथवा या कार्यालयाकडील सरपंच निवड घेणेबाबत पत्र (हार्डकॉपी अगर सॉफ्ट कॉपी) ईमेल द्वारे प्राप्त झालेली असेल तरी सदर सरपंच /उपसरपंच पदाची निवडणुक घेणे बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

(रविंद्र भारदे)
नोडल अधिकारी तथा उ.जि.(म.प्र.)
**जिल्हाधिकारी जळगांव**